# माझी जन्मठेप

**लेखक**
हिंदुहृदयसम्राट स्वातंत्र्यवीर
**विनायक दामोदर सावरकर**

**रिया पब्लिकेशन्स्, कोल्हापूर**

---

प्रमुख वितरक
**अजब डिस्ट्रिब्युटर्स**
६७८-ई, निदान हॉस्पिटलसमोर,
शाहूपुरी, २ री गल्ली, कोल्हापूर.

**माझी जन्मठेप : विनायक दामोदर सावरकर**

**© हिमानी सावरकर**

**जनआवृत्ती संकल्पना : श्री. नानासाहेब गोडसे**

**प्रकाशक**
रिया पब्लिकेशन्स्
२५०, ब-३०, शीतल बंगला,
नागाळा पार्क, कोल्हापूर.

**प्रमुख वितरक**
अजब डिस्ट्रिब्युटर्स
६७८-ई, निदान हॉस्पिटलसमोर,
शाहूपुरी, २ री गल्ली, कोल्हापूर.
मोबा. : ९४२२४२१५०२

**अक्षरजुळणी**
रावजी देसाई

**मुखपृष्ठ**
चित्रमित्र पब्लिसिटी, कोल्हापूर.

**मुद्रक**
श्री ज्योतिर्लिंग ऑफसेट, कोल्हापूर.

**आवृत्ती**
मार्च, २०१२ - ६,००० प्रती
मे, २०१२ - १२,००० प्रती
सप्टेंबर, २०१२ - ६,००० प्रती

**किंमत**
जनआवृत्ती रुपये १००/-

# *प्रास्ताविक*

**स्वजनस्य हि दु:खमग्रतो**
**विवृत्तद्वारमिवोपजायते।।** कालिदास

आमचा अंदमानाचा वृत्तान्त नि तेथें बंदिवास कंठित असतांना भोगाव्या लागलेल्या यातना यांची कहाणी अैकण्यासाठीं महाराष्ट्रांतच नव्हे, परंतु अुभ्या हिंदुस्थानांत आमच्या सहस्रावधि देशबांधवांनीं सहानुभूतिपूर्ण औत्सुक्य आजपर्यंत अनेक समयीं व्यक्त केलेलें आहे. त्यांतहि सुहृदांस आपण भोगिलेलीं अुत्कट सुखदु:खें सांगतांना समवेदनांच्या अश्रूंनीं स्निग्ध होणारा तो मधुर आनंद अुपभोगण्यासहि आमचें हृदय आमच्या सुटकेपासून साहजिकत:च कासावीस होत आलें आहे.

परंतु तरीहि आजपर्यंत कांही केल्या अंदमानाची कथा ओंठावर येत असतांहि ओंठाबाहेर येअीना. अंधकारांत वाढणाऱ्या कोण्या कांटेरी फुलवेलीप्रमाणें त्या अंधेऱ्या दिवसांची स्मृति अुजेड दिसतांच सुकून जाअू पाही, दिपून जाअी.

कधीं वाटे सांगण्यासाठीं का हें सगळें भोगिलें! तर मग तो सगळा अभिनयच म्हणावयाचा. कधीं वाटे आपणास भोगाव्या लागल्या त्या यातना भोगीत असतांनाच जे त्या यातनांस बळी पडले त्यांना घरीं परत येअून प्रियकरांस तीं सुखदु:खें सांगण्याचें समाधानहि मिळालें नाही. ते सहतपी आज आपणाबरोबर नाहींत. ज्यांच्यासह तपाचा अुत्ताप सहन केला त्यांस सोडून ह्या पारण्याच्या पंक्तींतील हीं मिष्टान्नें अेकट्यानेंच कशीं खावीं? ही त्यांच्याशी प्रतारणा तर होणार नाहीं ना?

आणि आपणांसारख्या कित्येक मनुष्यांवर आजपर्यंत हे खडतर संकटांचा सामना करण्याचे प्रसंग कोसळले आहेत नि अजून असले किंवा याहून भयंकर प्रसंग कोसळावयाचे आहेत. ह्या जीवनकलहाच्या नगाऱ्यांच्या घाअींत आपण काय ही आपली अेवढीशीशी टिमकी वाजवीत बसावें!

परंतु दु:खाच्या गळ्यांत किंकाळीचा ढोल हा निसर्गानेंच बांधिलेला आहे कीं, तो वाजवून त्यानें आपली शक्य ती करमणूक करून घ्यावी. ससाण्यानें झेप घालतांच विवश होअून त्याचे चोचींतच पडलेला पक्षी सहाय्याची लेशमात्र आशा नसतां जो स्वाभाविक चीत्कार करतो, त्या चीत्कारापासून तों नेपोलियनचें प्रेत सेंट हेलिनामधून पॅरिसला ज्या दिवशीं परत आणलें त्या दिवशीं अेक राष्ट्रचें राष्ट्र आपले ध्वज नमवून आपल्या सहस्र वाद्यांतून सहस्र शोकस्वर नि विरहगीतें गात जो दु:खाचा हंबरडा फोडतें झालें त्या हंबरड्यापर्यंत, त्या राष्ट्रीय अुद्रीतापर्यंत, जितका प्राणिमात्राचा आक्रोश आहे तितका आपआपल्या दु:खांची प्रसिद्धि करण्यांत चूर झालेला असतो. आक्रोश हा दु:खाचा स्वभावच आहे, तेव्हां या अनंत आकाशांत जे अनेक चीत्कार अुसासे टाकून आपापल्या दु:खांचा भार कमी करीत हिंडत आहेत त्यांत माझ्या दु:खानें प्रसिद्धीचा अुसासा कां टाकूं नये? या अनंत आकाशांत माझ्याहि आक्रोशाला अवकाश असेल! असें वाटून प्रवृत्ति, केव्हां केव्हां दु:ख अेकदांचे ओकून टाकण्यास, अगदीं सज्ज होअी. पण तोंच परिस्थिति तिचा पाय हिसडून तिला मागें खेंची.

कारण आमच्या सध्यांच्या परिस्थितींत आमच्या अंदमानच्या अनुभवांत जें सांगण्यासारखें आहे तेंच विशेषेंकरून सांगतां येणारें नाही. परिस्थितींत जें सांगतां येअील तें अगदीं वरवरचें, अुथळ वा सापेक्षत: क्षुल्लकसें वाटत असल्यानें सांगण्यास अुत्साह येत नाहीं आणि जें सांगण्यासारखें वाटत आहे तें परिस्थिति सांगूं देत नाही. अशा स्थितींत कांही तरी सांगून त्या कथानकाचें चित्र रंगहीन नि सत्त्वहीन करून टाकण्यापेक्षां प्रस्तुत कांही सांगूंच नये. कधीं तसा दिवस अुगवेल कीं ज्या दिवशीं सर्व गूढ आकांक्षा व्यक्त होअूं शकतील, सर्व मूक भावना मोकळेपणानें बोलूं शकतील त्या दिवशीं सांगावयाचें तें यथाप्रमाण सांगूं. तसा दिवस या आयुष्यांत न अुगवला तर नाहीं सांगणार, तें वृत्त जगानें अैकलें नाहीं म्हणून कांही त्याचें महत्त्व अुणावत नाहीं वा त्याची तीव्रता बोथट होत नाहीं. किंवा ह्या जगताच्या प्रचंड राहाटींत तें सर्व अश्रुत राहिलें म्हणून कांही मोठा खंड पडणर आहे असेंहि नाहीं, असें वाटे!

मनाच्या अशा शोकायमान स्थितींत आजपर्यंत अंदमानाच्या आमच्या आठवणी आमच्या प्रिय बांधवांस सांगण्याचें काम तसेंच राहून गेलें. आमच्या मागून अंदमानास आलेल्या आमच्या पूर्वी सुटलेल्या कित्येक राजकीय बंदींनी आपापले अनुभव प्रसिद्ध केलेले आम्ही पाहिले. अितरत्रहि वर्ष सहा महिन्यांसाठीं जे कारागृहांत पडले त्यांनीहि पण त्यांचे अनुभव नि त्यांच्या यातनांची कहाणीहि वेळोवेळीं प्रसिद्ध केलेली आमच्या वाचनांत येतच गेली. परंतु अशा आत्मस्मृतिकथनास आत्मश्लाघेचा अनिवार्यपणें लागणारा जो गंध तो आमचे मनास पुन: पुन: संकोचित करी आणि प्रियजनांपाशी आपलीं सुखदु:खें मन मोकळें करून सांगण्याची स्वाभाविक प्रवृत्ति गत नि जित संकटांच्या पराभवाची कथा सांगण्याचा आनंद अुपभोगण्यासाठीं अत्युत्सुक झालेली असतांहि परिस्थिति वाटेंत पुन: पुन: आडवी येअी.

तथापि जें काय अर्धेंमुर्धें वा अल्पस्वल्प सध्यांच्या परिस्थितींत सांगतां येण्यासारखें आहे तें तरी आपण सांगितलेंच पाहिजे. तेंहि आम्हास अत्यंत श्रवणीय वाटणारें आहे असा अगदीं अुत्सुक, निष्कपट नि प्रेमळ आग्रह प्रसिद्ध प्रकाशन मंडळ्यांपासून तों शाळेंतील मुलांपर्यंत आम्हांस अजूनहि अेकसारखा होत असल्यानें त्या आग्रहास आतां मान न देणें म्हणजे विनयाचा अतिरेक करून अेक प्रकारचा सार्वजनिक मनोभंग केल्यासारखें होअील असें आम्हांस वाटू लागलें आहे. अेतदर्थ परिस्थितींत जो काय सांगतां येअील तो आमचा अंदमानामधील वृतान्त सांगून टाकण्याचा आम्ही निश्चय केला आहे. सुसंगत नि सुस्पष्ट वृत्तान्तकथन अशक्य आहे हें अुघड असल्यानें ज्या कांहीं त्रोटक, तुटक नि संबंधविहीन आठवणी आम्हांस सांगतां येतील त्यांवरच वाचकांनी प्रस्तुत प्रसंगापुरतें समाधान मानून त्यांतील विसंगतपणाविषयीं वा अस्पष्ट अुद्गारांविषयीं तो परिस्थितीचा दोष समजून कांहीं दिवस क्षमा केली पाहिजे.

अशा वृत्तान्ताचा सार्वजनिक अुपयोग फार मोठा आहे हें आम्ही जाणून आहों. परंतु केवळ वृत्तान्तापेक्षांहि अशा दुर्घट परिस्थितींतील विचारांचा, विकारांचा नि भावनांचा अितिहास हा अधिक मनोरंजकच नव्हे तर बोधप्रदहि होणार असल्यानें आम्ही ह्या आठवणींत त्यास अधिक महत्त्व देणार आहों. परंतु ह्या आठवणी तुटक असल्यानें नि भावनांचा तो अितिहास पुसट, सूचक नि अस्पष्ट असाच सांगणें अपरिहार्य झाल्यानें संपूर्ण नि सुसंगत कथन प्रसिद्ध होअीतों आमच्या अंदमानामधील जीवनाविषयीं वाचकांनीं कोणताहि सामान्य सिद्धांत असा करून बसूं नये. ह्या आठवणींत सर्व वृत्त जरी सांगता आलें नाहीं तरी जें सांगितलें जाअील, तें अक्षरश:

नि भावार्थश:हि यथातथ्य सांगितलें जावें ह्याविषयीं शक्य ती दक्षता राखण्याचा यत्न केला जाअीलच.

या ग्रंथांत जे विचार, भावना नि घटना यांचें वर्णन येअील तें त्या त्या प्रसंगी अुद्भवलेल्या विचारभावनांदिकांचें निदर्शक असून आज तें केवळ अैतिहासिक दृष्टीनेंच वाचलें जावें अशी लेखकाची अपेक्षा आहे.

**– वि. दा. सावरकर**

रत्नागिरी, शालिवाहन संवत १८४७/सन १९२५

## माझी ‘जन्मठेप’ पुस्तकाची कहाणी !

हिंदुहृदयसम्राट स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर यांनीं लिहिलेल्या ‘माझी जन्मठेप’ ह्या स्वानुभव सांगणाऱ्या महान् ग्रंथाची ही स्वतंत्र पुस्तकरूपानें प्रसिद्ध होणारी तिसरी आवृत्ति आहे. त्यावाचून केसरी नि श्रद्धानंद ह्यामध्यें ही आत्मकथा क्रमश: प्रसिद्ध झाली असून समग्र सावरकर वाङ्मयाच्या पहिल्या खंडांत तिचा समावेश आहे. परकीय ब्रिटिश साम्राज्यसत्तेविरुद्ध बंड पुकारल्याच्या आरोपावरून श्री. विनायक दामोदर सावरकर यांना दोन जन्मठेपींची शिक्षा ब्रिटिशांच्या राज्यांतील न्यायालयानें दिली. ह्यासाठीं मुंबअीच्या अुच्च न्यायालयांत त्यांच्यावर दोन वेगवेगळे खटले भरण्यांत आले. ह्या नासिककटाच्या खटल्यांत वीर सावरकरांसमवेत अेकूण ३८ आरोपी होते! ब्रिटिश सरकारविरुद्ध युद्ध पुकारण्यासाठीं शस्त्रास्त्रें जमवून कट करणें हा आरोप सर्वांवर होता आणि ३८ वे आरोपी विनायक दामोदर सावरकर यांच्यावर असा विशेष आरोप होता कीं ‘‘त्यांनीं २४ डिसेंबर १९०९ ला नाशिक येथें झालेल्या जॅक्सनच्या वधाला लंडनमध्यें असतांहि ख्रिस्ताब्द १९०९ मध्यें सहाय्य करून मुंबअी न्यायालयाच्या कक्षेंत येणारा भारतीय दंडविधानाच्या अनुच्छेद ३०२ नि १०९ प्रमाणें दंडार्ह अपराध केला आहे.’’ ह्या आरोपाप्रमाणें चाललेला अभियोग प्राथमिक चौकशीनंतर १० सप्टेंबर १९१० ला दंडाधिकाऱ्यांनी मुंबअी अुच्च न्यायालयाच्या विशेष न्यायमूर्तींकडे सोंपविला. त्यांनीं २४ डिसेंबर १९१० ला निर्णय दिला कीं विनायक दामोदर सावरकर यांस जन्मभर काळेपाण्याची (Transportation For Life) शिक्षा द्यावीं! दुसरा खटला त्यानंतर चालून त्यांतहि न्यायमूर्तींनीं विनायक दामोदर सावरकर यांस दि. ३० जानेवारी १९११ ला दुसरी जन्मभर काळेपाण्याची शिक्षा ठोठावली! अशा प्रकारें पन्नास वर्षे किंवा दोन जन्म काळेपाण्याची शिक्षा परकीय ब्रिटिश साम्राज्याविरुद्ध प्राणपणानें लढणाऱ्या ह्या महान हिंदु सशस्त्र

क्रांतिकारकाला देण्यांत आली! त्याच जन्मठेपेचे कठोर सत्य असलेले भयानक स्वानुभव सांगणारा हा ग्रंथ वीर सावरकरांनीं त्या बंदिवासांतून १९२४ मध्यें सुटल्यावर लिहावयास घेतला! प्रथम १९२५–२६ मध्यें पुणें येथील 'केसरी'त त्याचा पूर्वार्ध नि १९२७ मध्यें मुंबअीमधील 'श्रद्धानंद' साप्ताहिकांत त्याचा अुत्तरार्ध क्रमश: प्रसिद्ध झाला! 'केसरी'मध्यें ह्या 'जन्मठेप' ग्रंथाअितकी दुसरी कोणतीहि, वाचक जिची अत्यंत आतुरतेनें वाट पहात असत अशी, माला दीर्घकाल चालली नाही! आणि तरीहि 'केसरी'ला हें पुस्तक पूर्णपणें छापतां आलें नाहीं! पुढें २० जानेवारी १९२७ पासून ह्या ग्रंथाचा अुत्तरार्ध 'श्रद्धानंद'मध्ये प्रसिद्ध होअूं लागला आणि मे किंवा जून १९२७ मध्यें तो पुस्तकरूपानें प्रसिद्ध झाला.

३१ मार्च १९२७ च्या श्रद्धानंदमध्यें ह्या पुस्तकाचें पुढीलप्रमाणें प्रासिद्धक दिलेलें आहे–

*त्वरा करा! तारीख १ मे १९२७ ला प्रसिद्ध होणार! नांवे नोंदवा !!*

**बॅ. विनायकराव सावरकर कृत**

**– माझी जन्मठेप –**

''केसरींत प्रसिद्ध झालेल्या लेखांत योग्य ती सुधारणा करून झालेला पूर्वार्ध व सुटून जन्मभूमीस परत येअीपर्यंतच्या वृत्तान्ताचा अनेक अद्‌भुतरम्य व रोमांचकारी प्रसंगांनीं भरलेला अुत्तरार्ध मिळून क्राअुन साअीझचीं सुमारें ५५० पृष्ठें; जाड, ग्लेझ कागद, सुबक छपाअी आणि अुत्कृष्ट कापडी बांधणी. 'श्रद्धानंद'च्या वर्गणीदारांसहि तारीख १ जून १९२७ पर्यंत किंमत २। रुपये. टपालखर्च निराळा पडेल. श्रद्धानंद कार्यालय, मुंबअी नंबर ४.''

ह्यावरून हा ग्रंथ स्वतंत्र पुस्तकरूपानें मे १९२७ मध्ये प्रसिद्ध झाला असावा असें दिसतें! पण मे आणि जूनच्या पहिल्या दोन आठवड्यापर्यंतच्या श्रद्धानंदात ग्रंथ प्रसिद्ध झाल्याची वार्ताहि नाहीं! तो गाजावाजा न करितां प्रथम ग्राहकांना देण्यांत आला असावा. आणि त्याचें तसें वितरण पूर्ण झाल्यावर २३ जून १९२७ ला 'श्रद्धानंद'मध्यें हा ग्रंथ मुंबअी, अकोला, नागपूर नि अमरावती येथें मिळण्याचे पत्ते दिलेले आहेत! 'जन्मठेप' पुस्तकाची तीन सहस्र प्रतींची पहिली आवृत्ति १९३० मध्ये संपत आलेली दिसते. दि. २९ मार्च १९३० च्या श्रद्धानंदमध्ये तशा आशयाचें जें प्रासिद्धक आहे तें असें–

> **'माझी जन्मठेप' –** बॅ. सावरकरकृत 'माझी जन्मठेप' ह्या पुस्तकाची पहिली आवृत्ति संपत आली. तिची दुसरी आवृत्ति छापणें आहे. त्यावांचून बॅ. सावरकरांची स्फूट कविता आणि बॅ. सावरकरांचें चरित्र हींहि ज्यांना प्रकाशित करावयाचीं असतील त्यांनी ३० मे १९३० पर्यंत मागणी करावी.

**पुस्तकावर बंदी :**

पुढें थोड्याच दिवसांत ह्या पुस्तकाचा गुजराती अनुवाद कर्णावतीच्या प्रस्थान कार्यालयानें प्रसिद्ध केला. त्यानंतर दि. १७.४.३४ ला हा ग्रंथ राजहत करण्याची आज्ञा देण्यांत आली. ती आज्ञा अशी : 'भारतीय मुद्रण (आणिबाणीचे अधिकार) निर्बंध १९३१ च्या नियम १९ नें दिलेल्या अधिकारांत राज्यपाल अशी घोषणा करीत आहे कीं विनायक दामोदर सावरकर यांनी लिहिलेलें, दिनकर सखाराम साखळकर यांनीं लोकसेवा प्रेस, गिरगांव मुंबअी, येथे मुद्रित केलेलें आणि के. अेम. सिनकर, खटाव बिल्डिंग, मुंबअी ४ यांनीं प्रकाशित केलेलें 'माझी जन्मठेप' हें पुस्तक, तें ज्यांत मुद्रित केलेलें आहे असे अन्य सर्व कागद, ह्याच्या पुनर्मुद्रित किंवा भाषांतरित प्रती, ह्यांतील अुतारे घेतलेले लेख हे सर्व सम्राटासाठीं राजहत करण्यांत यावेत. कारण राज्यपालांना आढळून आलें आहे कीं ह्या वरील निर्बंधाच्या १९३२ च्या दंडविधानाप्रमाणें सुधारलेल्या विभाग ४ (१) च्या बी नि सी अनुनियमाखालीं आक्षेपार्ह ठरविलेल्या प्रकारचे शब्द ह्या पुस्तकांत आहेत!

ह्या बंदीचा धिक्कार करतांना २० अेप्रिल १९३४ च्या 'केसरी'त म्हटलें आहे कीं, ''अंदमानातील बंदिवानांची हकिकत वर्णन करणारें हें पुस्तक मराठी वाचकांच्या हातांत गेलीं कित्येक वर्षे वावरत असूनहि त्यामुळें सार्वजनिक शांततेस धोका पोंचल्याचा दूरचा पुरावाहि अुपलब्ध नाहीं. आणि ज्या कायद्याखालीं तें पुस्तक सरकारजमा करण्यांत आलें तो कायदा जन्मास येअूनहि अुणीपुरीं तीन वर्षे झालीं. त्या अवधींत जें पुस्तक वरील कलमांचें अुल्लंघन करीत नव्हतें तें अेकाअेकीं गेल्या आठवड्यांत अितकें भयंकर कसें बनावें? अिंग्रजीमध्यें त्या पुस्तकाचें भाषांतर नुकतेंच झालें हा त्याचा प्रसार तर सरकारी डोळ्यामध्यें सलला नसेल ना?... अेखाददुसऱ्या

'शब्दाचे' वावडें वाटून घेऊन सबंध पुस्तकच्या पुस्तक फांसावर लटकविण्याच्या सरकारी धोरणाचा कडकडून निषेध साहित्य संमेलनें दरसाल करीत असतां सरकारनें अेकदम सुरकांडी मारून हें नवें माणिक गिळल्यानें, खुद्द लेखकापेक्षां महाराष्ट्र वाङ्मयाची हानी फार मोठी झालेली आहे.'' (ह्यांतील 'अिंग्रजींत भाषांतर' हा शब्द चुकीचा दिसतो. तेथे 'गुजरातींत' असा शब्द हवा. कारण ह्या पुस्तकाचें अिंग्रजी भाषांतर तेव्हां प्रसिद्ध झालेले नाहीं.) ह्या पुस्तकावर १७-४-१९३४ ला बंदी आली. त्यानंतर नअूच दिवसांनी दि. २६-४-१९३४ ला मुंबअींतील धोबीतलाव येथें अेका ब्रिटिश अधिकाऱ्यावर गोळ्या झाडण्यांत आल्या. हा गोळीबार वीर सावरकरांच्या रत्नागिरी येथील कार्यालयांतील वीस वर्षांचे अेक अुत्साही तरुण वामनराव चव्हाण यांनीं केला नि दुसऱ्याच दिवशीं दि. २७ ला वीर सावरकरांच्या रत्नागिरी येथील निवासस्थानाची झडती घेण्यांत आली. दि. ७ मे स वीर सावरकरांना अटक झाली नि दि. २१ ला त्यांना सोडण्यांत आले. हा गोळीबार ही जन्मठेपेवरील बंदीची प्रतिक्रिया असावी!

**'प्रजाबंधु'कडून प्रतिभू!**

ही बंदि आज्ञा निघतांच १९ अेप्रिल १९३४ ला, हें पुस्तक प्रसिद्ध करणारे कर्णावती (अहमदाबाद) येथील प्रस्थान कार्यालय नि अुत्कृष्ट प्रिंटिंग प्रेस यावर पोलिसांनी छापा घालून 'माझी जन्मठेप' ह्या पुस्तकाच्या गुजराती प्रती राजहृत केल्या. ह्या गुजराती अनुवादांतील कांहीं भाग प्रसिद्ध करणाऱ्या 'प्रजाबंधु' ह्या गुजराती साप्ताहिकाचे मुद्रक-प्रकाशक अिंद्रनंदन बळवंतराय ठाकोर यांच्यावर दोन सहस्र रुपये प्रतिभू भरण्याची आज्ञा बजावण्यांत आली.

अशा प्रकारें ह्या पुस्तकाचें गुजराती भाषांतर झाल्यानंतर हें पुस्तक राजहृत करण्यांत आलें! मराठी भाषेंत सहासात वर्षें हें पुस्तक प्रचलित असतांहि तें राजहृत करावें अशी बुद्धि शासनाला सुचली नाहीं किंवा तशी मागणीहि कोणी केली नाहीं. पण तेंच पुस्तक गुजरातींत भाषांतर झाल्यावर तें राजहृत कां व्हावें? तशी मागणी कोणी केली असावी काय? शस्त्रवादाचा धिक्कार करणाऱ्या शिवाजी, राणाप्रताप यांना ते शस्त्राचारी म्हणून चुकलेले देशभक्त म्हणणाऱ्या आणि पृथ्वीसिंग प्रभृती सशस्त्र भूमिगत क्रांतिकारकांना शासनाच्या आधीन होण्याचा अुपदेश करणाऱ्या नि हिंदु मुस्लिम अैक्याच्या नांवाखालीं मुसलमानांची लाळ घोटणाऱ्या कोणीतरी हें पुस्तक राजहृत करण्याची चहाडी केली असावी अशी शंका अनेकांनीं व्यक्त केलेली आहे!

**बंदी अुठविण्याची मागणी**

पुढें श्री. बाबाराव सावरकर यांनीं भास्कर भुवन, माहिम येथें रहात असतांना १९३७ मध्यें ह्या पुस्तकाचे प्रकाशक म्हणून ह्या पुस्तकावरील बंदी अुठविण्याचें आवेदन दिलें. पण तें सफल झालें नाहीं. त्यानंतर १९३७ मध्यें मुंबअी राज्यांत कॉंग्रेसचें मंत्रिमंडळ आलें तेव्हां अनेक संस्थांनीं नि व्यक्तींनीं ह्या पुस्तकावरील बंदी अुठविण्याची मागणी केली होती.

**वा. वि. साठे यांचा प्रयत्न**

ऑगस्ट १९३७ मध्यें त्यावेळी अंदमानांत असणाऱ्या बंदींनी केलेल्या अन्नसत्याग्रहाला सहानुभूति दाखविण्यासाठीं पुण्यांतले अेक कार्यकर्ते श्री. वा. वि. साठे यांनीं पूर्व अनुज्ञा न मागतां २९-८-१९३७ ला पुण्यांत अेक मिरवणूक काढली. ही मिरवणूक संपल्यावर शनिवारवाड्यापुढें त्यांनीं सांगितलें कीं मी आतां 'माझी जन्मठेप' ह्या राजहृत पुस्तकांतील पान १९१ वरील अुतारा वाचून दाखविणार आहें. हें पुस्तक बॅ. सावरकरांचें आहे. मला सरकारची अन्यायबंदी जाणूनबुजून मोडावयाची आहे. जोंवर राजहृत पुस्तकांवरील बंदी सरकार अुठवीत नाहीं तोंवर मी त्यांचें वाचन करणार आहें. श्री. साठे यांनीं त्या पुस्तकांतील पांचसहा वाक्यें वाचतांच आरक्षक अुपनिरीक्षक श्री. देऊळगांवकर टेबलाजवळ गेले नि त्यांनीं तें पुस्तक राजहृत केलें! तेव्हां श्री. साठे नि सभेंतील अनेक लोकांनीं 'धन्य शिवाजी तो रणगाजी धन्यची तानाजी प्रेमें अजि सिंहगडाचा पोवाडा गाजी' हा वीर सावरकर रचित तानाजीचा राजहृत पोवाडा म्हणण्यास प्रारंभ केला! ही सावरकरांच्या राजहृत वाङ्मयावरील बंदी अुठविण्याची मागणी पुढें अनेकांनीं केलेली आहे. 'ह्या संबंधीचा आपण विचार करीत आहों' अशा आशयाचें मंत्रीथाटाचें अुत्तरहि अनेकांना मिळालें आहे! पण तशी बंदी त्या काळांत अुठविण्यांत आली नाहीं!

पुढें १९४५ मध्यें पुन्हा कॉंग्रेस मंत्रिमंडळ सत्तारूढ झालें त्यावेळीं पुन्हा राजहृत ग्रंथांवरील बंदी अुठविण्याची मागणी अेकसारखी करण्यांत आली. कांही जणांनीं तर हीं पुस्तकें छापून अुघडपणें विकण्याचीहि घोषणा केली. तेव्हां दि. २२ मे १९४६ ला वीर सावरकरांच्या पुस्तकांवरील बंदी अुठविण्यात आली.

‘मॅझिनीचें आत्मचरित्र’, ‘सत्तावनचें स्वातंत्र्यसमर’, ‘बाजी प्रभू’, नि ‘तानाजी’ यांचे पोवाडे आणि ‘जन्मठेप’ ह्या वीर सावरकरांच्या ग्रंथावरील बंदी अुठतांच हीं क्रांतिकारक नि स्फूर्तिदायक पुस्तकें आतां अुघडपणें वाचावयास मिळणार म्हणून साऱ्या महाराष्ट्राला आनंद झाला. अनेकांनीं शासनाचें अभिनंदन केलें. बंदी होती तरी गुप्तपणें हीं सारीं पुस्तकें वाचलीं जातच होतीं. त्यापासून अनेकजण स्फूर्ति घेत होते. आतां तीं अुघडपणें घरांत ठेवतां यावींत, पुन्हां पुन्हां वाचतां यावींत ह्यासाठी त्या पुस्तकांना मागणी येअूं लागली. ‘जन्मठेप’ ह्या पुस्तकाची दुसरी अुघड आवृत्ति ‘हिंदुराष्ट्र ग्रंथमालेचें पांचवें पुष्प’ म्हणून संवत २००३, खिस्ताब्द १९४७ मध्यें परचुरे पुराणिक मंडळींनें प्रकाशित केली! आणि तिला भरपूर मागणीहि येअूं लागली!

**पुस्तकांवर पुन्हां संकट!**

परंतु अेवढ्यांत ३० जानेवारी १९४८ ला गांधीजींचा वध झाला आणि त्यांत अेक आरोपी म्हणून वीर सावरकरांना गोविलें गेलें! तेव्हां वीर सावरकरांचीं हीं पुस्तकें विकत घेण्यास वाचक दचकूं लागले! वीर सावरकरांच्या पुस्तकांवर नवें संकट आलें. त्यामुळें पुढें कांहीं वर्षांनीं १९५२-५३ मध्यें ‘माझी जन्मठेप’ हें पुस्तक मुंबअीच्या पदपथावर सव्वा सव्वा रुपयास मिळूं लागलें! वीर सावरकर, विनोदानें म्हणाले ठीक झालें! आतां अनेकजण स्वस्त पुस्तकें घेअून वाचूं लागतील. आणि खरोखरच तसें झालें. आठ रुपयांचें अितकें अुत्तम पुस्तक सव्वा रुपयात मिळूं लागतांच सर्वसाधारण वाचकहि तें विकत घेअूं लागला. पुस्तकाला सारखी मागणी येअूं लागली आणि प्रतिदिन पुस्तकाचें मूल्य वाढत जाअूं लागलें! आणि पुन्हा तें पूर्ण मूल्याला विकलें जाअूं लागलें!! पदपथावर विक्रीसाठीं निघालेल्या पुस्तकाचें असें मूल्य वाढण्याचा ‘जन्मठेप’ ह्या ग्रंथानें मिळवलेला सन्मान मराठी साहित्यांत तरी अपूर्वच आहे.

थोड्याच दिवसांत ह्या ग्रंथाची गुजराती, कानडी नि अिंग्रजी आवृत्तीहि काढण्यांत आली. त्या आवृत्त्याहि गांधीवधाच्या आपत्तींत सापडल्या! त्यामुळें त्यावेळीं हिंदी आवृत्ति निघूं शकली नाहीं. दोन वर्षांपूर्वी नागपूरच्या पृथ्वीराज प्रकाशननें ती काढली आहे! ह्या ग्रंथाची संक्षिप्त मराठी आवृत्तीहि ग. पां. परचुरे प्रकाशननें प्रसिद्ध केली आहे. ‘हिंदुवाणी’मध्यें बंगाली अनुवाद क्रमश: प्रसिद्ध होत आहे. मध्यंतरी केंद्र शासनाच्या कक्षेतील साहित्य प्रबोधिकेनें ह्या ग्रंथाच्या सर्व भारतीय भाषांतून आवृत्त्या काढण्याची घोषणा केली होती! पण अद्याप प्रबोधिकेनें ती कृतींत अुतरविली नाहीं. कोण आडवें आलें तें त्या राजकर्त्यांनाच ठाअूक!

त्यानंतर १९६३ मध्यें समग्र सावरकर वाङ्मयांत हा ग्रंथ छापला गेला आहे आणि आतां ह्या ग्रंथाची ही नवी आवृत्ति ग. पां. परचुरे प्रकाशन मन्दिर प्रसिद्ध करीत आहे! सात सहस्र वाचकांनीं ह्या ग्रंथाचे प्रसिद्धीपूर्व मूल्य देअून ह्या ग्रंथाविषयीचा आदर नि अुत्सुकता व्यक्त केली आहे! **प्रबोधिकेच्या राजमान्यतेपेक्षां ही लोकमान्यता अधिक मोलाची आहे!**

**पुस्तकांत नवी भर**

ह्या नव्या आवृत्तीचें वैशिष्ट्य असें आहे कीं त्यांत मी शक्य तेवढ्या तळटीपा दिल्या आहेत. वीर सावरकरांनीं त्या काळच्या परिस्थितींत ह्या ग्रंथांत आपले कांहीं विचार पूर्णपणें मांडलेले नाहींत! ह्या आवृत्तींतहि ते पूर्ण केलेले नाहींत, कारण आमच्याप्रमाणेंच कोणीहि सुज्ञ वाचक ते थोड्या विचारानें पूर्ण करूं शकेल! तसा प्रयत्न त्यानें करून पहावा!

हा ग्रंथ केवळ बंदिवासांतील कष्टांचें हृदयद्रावक वर्णन करणारा नाहीं तर भयंकर आपत्तींतहि माघार न घेतां किंवा शरण न जातां झुंजत रहाण्याची स्फूर्ति देणारा आहे! अेवढेंच नव्हे तर आपल्यापुढील अनेक प्रश्नांवर योग्य ते अुपायहि हा ग्रंथ सांगत आहे. ह्या ग्रंथाच्या अुत्तरार्धांतील ‘अंदमानांत शुद्धि’, ‘हिंदीचा प्रचार’, ‘मरणोन्मुख शय्येवर’ आदि प्रकरणें आजच्या नि चिरंतन प्रश्नांवरहि मार्गदर्शन करणारीं आहेत. हिंदुस्थान स्वतंत्र करण्यासाठीं सशस्त्र क्रांतिकारकांनीं किती कष्ट सहन केले त्यांचें ह्या ग्रंथांतील वृत्त वाचून प्रत्येकानें निर्धार केला पाहिजे कीं आतां आपण अखंड हिंदुस्थानचें स्वातंत्र्य अबाधित राखण्यासाठीं सतत प्रयत्न करूं!

विजया दशमी
विक्रमसंवत २०२४
दि. १-१०-६८ **बाळ सावरकर**

---

**टीप :** श्री. बाळ सावरकर यांचें संपूर्ण नाव शांताराम शिवराम सावरकर : ते स्वा. वीर सावरकरांचे १९५० ते ६५ पर्यंत वैयक्तिक कार्यवाह होते. वीर सावरकरांनी त्यांच्या सर्व प्रकाशित नि अप्रकाशित लेखनाचे सर्वाधिकार श्री. बाळाराव सावरकर यांना दिले आहेत. त्यानंतर सदर सर्व हक्क श्री. बाळाराव सावरकर यांनी श्रीमती हिमानी सावरकर यांच्याकडे दिले आहेत.
**– प्रकाशक**